# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक १ ऑगस्ट, २०१३
## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत )

**लक्षवेधी सूचना - (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

(१) **श्री. विनोद तावडे,** ॲड. आशिष शेलार, सर्वश्री, पांडुरंग फुंडकर, चंद्रकांत पाटील **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"विदर्भातील सिंचनाच्या अनुशेष वाढत असताना अधिकारी व कंत्राटदारांनी संगनमताने मध्यम व मोठ्या प्रकल्पांच्या किंमती दहापटीने वाढविणे, बुलढाणा जिल्ह्यातील नांदूरा तालुक्यात जिगाव प्रकल्पाची किंमत सन १९९० मध्ये ३९६ कोटी रुपये असताना सन २०१० मध्ये ती ४,०४४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचणे, त्याचप्रमाणे, उर्ध्व मंडळ प्रकल्पांतर्गत वाघाडी लघु प्रकल्प व रायगड लघु प्रकल्पांच्या कामांमध्ये कटऑफ ट्रेन्चमध्ये कंत्राटदाराने अतिरिक्त पैसे लाटणे, जिगाव प्रकल्पाच्या ६ गटांमध्ये काढण्यात आलेल्या निविदा भरणाऱ्या एकूण ९ कंत्राटदारांपैकी ३ कंत्राटदार डमी असल्याने ६ कंत्राटदारांनीच कामांची रिंग करुन सदर कामे घेणे, जिगाव प्रकल्पामध्ये दिलेले स्टीलचे दर खूप जास्त असल्याचे वडनेरे समितीने देखील त्यांच्या अहवालात नमूद करणे, या दोषी अधिकारी व कंत्राटदार यांचेवर कारवाई करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, त्याचप्रमाणे, वाघाडी लघु प्रकल्प तसेच, रायगड लघु प्रकल्पाच्या कामांसाठी दिलेल्या अतिरिक्त देयकाची गुणवत्ता नियंत्रण विभागाकडून चौकशी करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई."

**(बुधवार, दिनांक ३१ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना) - (अनुक्रमांक २ व ३)**

(२) **श्री.रामदास कदम,** डॉ. दिपक सावंत **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गेल्या ४० ते ५० वर्षांपूर्वी मुंबई शहरात प्रभादेवी येथे वसविण्यात आलेल्या कामगार नगर नं.१ सहकारी गृहनिर्माण सोसायटीची इमारत अत्यंत धोकादायक अवस्थेत असणे, या इमारतींचा पुनर्विकास त्याच ठिकाणी करण्याचा येथील रहिवासी

सोसायटीने केलेला प्रस्ताव, या संदर्भात करण्यात आलेल्या सर्व्हे मध्ये तेथील फक्त ८२ कुटुंबांचाच सर्व्हे केला असून ३६८ कुटुंबांचा सर्व्हे केला नसल्याची माहिती माहितीच्या अधिकारात प्राप्त झालेल्या माहितीवरून उघड होणे, परंतु या ठिकाणी डी.पी.रोड. व आर.जी. दाखवून ही वस्ती हलविण्याचे सध्या सुरू असलेले कारस्थान, याबाबत या रहिवाश्यांनी मा.मुख्यमंत्र्यांशी केलेल्या पत्रव्यवहारानुसार दिनांक २० सप्टेंबर, २०११ रोजीच्या सुमारास मा.मुख्यमंत्र्यांनी दिलेले चौकशीचे आदेश, या आदेशानुसार अद्यापही कोणतीच चौकशी संबंधित विभागाकडून करण्यात आलेली नसणे, त्यातच जे.एम.स्कायलार्फ बिल्डकॉन प्रा.लि. यांनी सर्व्हे नं.४३८ लोअर परेल विभाग, या ठिकाणी गोमातानगर गृहनिर्माण सोसायटी, नेहरूनगर गृहनिर्माण सोसायटी सर्व्हे नं.२६८ व माहिम विभाग एकत्र करून ही योजना राबवित असणे, परंतु नेहरूनगर मधील रहिवाशांचे पुनर्वसन होत नसल्याने तेथील जमिनीवरील आरक्षण प्रभादेवी रोड, येथील कामगार नगर, नं.१ मध्ये दाखविण्यात येणे, त्याचप्रमाणे कामगार नगर नं. १ वस्तीच्या जवळून जाणाऱ्या नाल्याची रूंदी १२० फुटावरून ६० फुटावर करून नेहरूनगरमधील रहिवाशांचे पुनर्वसन करण्यासाठी कामगार नगरमधील रहिवाश्यांना गुंडांच्या सहाय्याने हुसकावून लावण्याचे होत असलेले प्रयत्न, यामुळे परिसरात सध्या भितीचे व दहशतीचे पसरलेले वातावरण, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री. अमरसिंह पंडित वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"बीड जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बँका, शेडयूल्ड कमर्शियल बँका तसेच आयसीआयसीआय, ॲक्सिस, आयडीबीआय इत्यादि बँकेत जिल्ह्यातील ठेवीदारांच्या ३,७७,८९९ लक्ष रूपयांच्या ठेवी जमा असणे, ठेवीच्या प्रमाणात या बँकानी कर्ज वाटप करण्यास नकार देणे, आयसीआयसीआय बँकेने १७१ कोटी रूपयांच्या ठेवीपोटी ६ कोटी रूपयांचे कर्ज वाटप करणे, ॲक्सिस बँकेने २९ कोटी रूपयांच्या ठेवीपोटी केवळ ४ कोटी रूपयांचे कर्ज वाटप करणे, स्टेट बँक ऑफ हैदराबादने १,१९२ कोटी रूपयांच्या ठेवीपोटी केवळ ७१० कोटी रूपयांचे कर्ज वाटप करणे, जिल्हा मध्यवर्ती बँक आणि महाराष्ट्र ग्रामीण बँक वगळता इतर बँकांनी कर्जाचे ठेवींशी आदर्श प्रमाण (सीडी रेशो) निर्धारित प्रमाणात न पाळणे, शासनाच्या निकषाप्रमाणे, कर्जदारांना अल्पव्याज दर किंवा शुन्य टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध न करणे, अनेक बँकांनी शासनाकडून

सवलतीच्या  व्याजदराची रक्कम स्विकारूनही कर्जदार शेतकऱ्यांना व्याजाची सवलत न देणे, खाजगी बँकांना सवलतीच्या दरात पिक कर्ज वाटपाच्या दृष्टीने शासनाने व्याजातील फरक मंजूर करणे, परंतु राज्य शासनान् त्यांच्या वाट्याचा फरक त्या बँकाना मंजूर न करणे, यामुळे जिल्ह्यातील लाखो शेतकरी शेती कर्जापासून वंचित राहणे, यामुळे ऐन दुष्काळी परिस्थितीत शेतकरी त्रस्त होणे, जिल्ह्यातील बँकांनी उद्दिष्टाप्रमाणे व सवलतीच्या व्याजदरात कर्ज वाटप करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येणे, या मागणीकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने या गंभीर विषयाबाबत करावयाची सत्वर कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री. मोहन जोशी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता तेथील अत्यंत जटील असलेल्या वाहतूक कोंडीच्या प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी पुणे मेट्रोचा वनाज ते रामवाडी हा पहिला व पिंपरी-चिचवड ते स्वारगेट मार्ग कात्रजपर्यंन्त वाढवून दुसरा मार्ग असे एकूण रुपये १०,१८३ कोटींचे दोन्ही प्रस्ताव जानेवारी महिन्यापासून राज्य शासनाच्या वित्त विभागाची मंजुरी व त्यानंतर केंद्र शासनाकडे पाठविण्यासाठी प्रलंबित असणे, अनेकवेळा सभागृहात आश्वासन देऊनही अद्याप सदर प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे आलेला नसणे, तसेच, पुणे शहरातील झोपडपट्टीधारकांसाठी आहे त्याच जागेत घर देण्याची झोपडपट्टी पुनर्वसन योजना (एसआरए) सुरू होऊन ८ वर्षे उलटणे, तसेच, या योजनेची नियमावली मंजूर होऊन दीड वर्षे झाल्यांनतर देखील यासंदर्भात राज्य शासनाकडून अध्यादेश काढण्यास झालेली दिरंगाई, नियमावलींची अंमलबजावणी करण्यास होणाऱ्या विलंबामुळे पुणे शहरातील अनेक विकास योजनांचे प्रस्ताव प्रलंबित असणे, पुणे येथे 'एसआरए' अंतर्गत नियमावलीची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत नागरिकांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्रीमती विद्या चव्हाण वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुंबईतील तुर्भे, इंदिरानगर येथील रुम नं. १४५६ येथे मांत्रिकाचे काम करणाऱ्या सुमनकुमार श्रीरामप्रवेश तिवारी यांने दिनांक ३० एप्रिल, २०१३ च्या दरम्यान तेथेच राहणाऱ्या तरुणीवर मंत्रतंत्र करुन तिचा "आकडी" हा आजार बरा करण्याच्या

बहाण्याने केलेला बलात्कार, या घटनेमुळे अशा भोंदूबाबांच्या विरोधात येथील नागरिकांकडून कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, भोंदूबाबांकडून भोळ्या-भाबड्या लोकांची आर्थिक व मानसिक फसवणूक होत असणे, अशा मांत्रिकांवर कोणतीही कारवाई हात नसल्यामुळे नागरिकांमध्ये शासनाप्रति निर्माण झालेली चिडीची भावना, भोंदू बलात्कारी मांत्रिकांवर शासनाने कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री. विनायकराव मेटे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्य मागासवर्गीय आयोगावरील सदस्यांना तीन वर्षांपेक्षा जास्त कालावधी होवूनही सदस्यांना अद्यापही बदलण्यात न येणे, याबाबत सभागृहात कालबाह्य झालेल्या सदस्यांना बदलण्यात येईल असे आश्वासन देवूनही कार्यवाही न होणे, राज्य मागासवर्गीय आयोगाने शासनाकडे केलेल्या विविध सूचना / शिफारशी या मराठा समाजाच्या इतर मागासवर्गीयामध्ये समावेश करण्याबाबतच्या प्रलंबित मागण्यांच्या विरोधात असणे, त्यामुळे मराठा समाजातील लोकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **सर्वश्री विजय उर्फ भाई गिरकर,** विनोद तावडे, ॲड. आशिष शेलार, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"भगवान गौतम बुध्दांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या जि.ठाणे, ता.वसई येथील सोपारा गावातील बोध्दस्तुपाच्या १०० मीटर परिघाच्या परिसरात कोणतेही बांधकाम, खोदकाम करण्यास पुरातत्व विभागाने मज्जाव केला असणे, त्यामुळे गेल्या कित्येक वर्षापासून या परिघ क्षेत्रातील खाजगी जमीन मालकांनीही बांधकाम किंवा खोदकाम केले नसणे, मात्र काही दिवसांपासून स्तुपाच्या समोर असलेल्या तलावातून मातीचा दररोज जेसीबीच्या उजेडात रात्रभर अवैधरित्या होत असलेला उपसा, या प्रकरणी महापलिकेशी संपर्क साधला असता सदर तलाव खाजगी असल्याचे सांगण्यात येणे, माती उपसा करण्यासाठी आवश्यक असलेली पुरातत्व विभाग तसेच गौण खनिज विभागाची परवानगी आणि महापालिकेची ना-हरकत दाखला घेण्यात आलेला नसणे, परिणामी तेथील स्थानिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **सर्वश्री. रामनाथ मोते,** विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो गाणार, मितेश भांगडिया, चंद्रकांत पाटील, डॉ.रणजित पाटील, नितीन गडकरी, वसंतराव खोटरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"दिनांक २ मे, २०१२ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील शाळांच्या पटपडताळणीमध्ये ५० टक्क्यांपेक्षा अधिक अनुपस्थिती असलेल्या शाळांची मान्यता काढून घेण्याचा निर्णय शासनाने घेणे, मान्यता काढून घेण्यात आलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे अन्य, शाळांमध्ये समायोजन होणे, ५० टक्क्यांपेक्षा कमी अनुपस्थिती असलेल्या शाळांवर सुद्धा कारवाई होणे, तथापि मान्यता काढून घेण्यात आलेल्या शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतरांना अतिरिक्त ठरवून त्यांचे अन्य शाळांमध्ये समायोजन करण्याची शासनाने भूमिका घेणे, ५० टक्क्यांपेक्षा अधिक अनुपस्थिती असलेल्या व मान्यता काढून घेण्यात आलेल्या शाळांमधील शिक्षक-शिक्षकेत्तरांना समायोजनापासून वंचित ठेवून त्यांच्या सेवा संपुष्टात आणणे, या धोरणामुळे हजारो शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी बेरोजगार होणे, त्यांना रोजगार हमीच्या कामावर जावे लागणे, त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणे, बंद पडलेल्या शाळांमध्ये शिक्षकांचे समायोजन करताना शासनाने भेदभाव करणे, याबाबत शिक्षक व शिक्षकेतरांमध्ये निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

(९) **श्री. सुभाष चव्हाण वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **रोजगार हमी योजना मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यातील महात्मा गांधी रोजगार हमी योजनेत वेळोवेळी आढळून येणारी अनियमितता, अनेकवेळा कामामध्ये होत असलेली दिरंगाई व टाळाटाळ यामुळे योजनेचे लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी वारंवार येत असलेल्या अडचणी, या योजनेत आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संगणकीकरणाचा वापर करुन शासकीय पातळीवर एकसूत्रता व पारदर्शकता निर्माण करण्याची आवश्यकता, राज्यात नरेगा योजनेत सध्या वारंवार उद्‌भवणाऱ्या समस्या व अडचणी दूर होऊन सदर योजना परिणामकारक रित्या राबवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संगणकीकरणाचा वापर करण्याची असलेली नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१०) **श्री. संजय दत्त, श्रीमती अलका देसाई, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती**

**चवधरी, श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर शहराची आजमितीस लोकसंख्या १५ लाखांवर असताना जेमतेम १० लाख लोकसंख्येला पुरेल इतकाच पाणीपुरवठा स्टेम प्राधिकरण आणि एम.आय.डी.सी. कडून होत असणे, नवी मुंबई महानगरपालिकेला मोरबे धरणातून पाणी मिळू लागले की या महानगरपालिकेने उल्हास नदीतला त्यांचा १४० एम.एल.डी. कोटा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला द्यावा असा निर्णय तत्कालीन जलसंपदा मंत्री यांनी घेतलेला होता, या नुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने नवीन पाणी पुरवठा योजना आखून दोनशे कोटी रूपये खर्चून ती पूर्णदेखील करणे, मात्र अद्यापही सदर निर्णयानुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला पाणीपुरवठा होत नसणे, एम.आय.डी.सी.कडून सध्या होत असलेला ११६ एम.एल.डी. पाणीपुरवठा जलसंपदा विभागाकडून थेट कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनामार्फत कोणतीच कार्यवाही करण्यात न आल्याने, जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका."

(११) **सर्वश्री किरण पावसकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या सुमारे १३,५०० उपकर प्राप्त इमारती ह्या अत्यंत धोकादायक असणे, ह्यामधील भाडेकरुंच्या समस्येबाबत दुरुस्ती मंडळाचे उदासिन धोरण, त्यामुळे प्रत्येक पावसाळ्यात हे भाडेकरु जीव मुठीत धरुन जगत असणे, दुरूस्ती कामास होणारा विलंब, संक्रमण शिबीराची दुरावस्था, बृहत सुचीवरील भाडेकरुंना हक्काचे घर मिळण्यास वर्षानुवर्षे होणारा विलंब, पुनर्विकासातील ३३(७), ३३(९) अंतर्गत भाडेकरुंना विश्वासात न घेता ना-हरकत प्रमाणपत्रे रद्द करणे, स्थगिती देणे, यामध्ये झालेली अनियमितता, यासर्वांमुळे भाडेकरु/रहिवाशांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व भीतीचे वातावरण, यामध्ये शासनाने तातडीने हस्तक्षेप करुन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) तारांकित प्रश्नांची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | **मा.उप मुख्यमंत्री** | : **(क)** | "मराठवाडा वैधानिक विकास महामंडळास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत" या विषयावरील श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३४६९९ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१२ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे. |
| | | : **(ख)** | "मराठवाडा वैधानिक विकास महामंडळास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत" या विषयावरील श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३४६९९ वर दिनांक २१ डिसेंबर, २०१२ रोजी श्री.राणा जगजितसिंह पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्यासंदर्भात दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे. |
| (२) | **मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** | : | "राज्यातील मागासवर्गीय रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत" या विषयावरील श्री.विनोद तावडे, वि.प.स. तसेच श्री.संजय केळकर, श्री.सय्यद पाशा पटेल व श्री.केशवराव मानकर, माजी वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ९२८२ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१० रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे. |
| (३) | **मा.कामगार मंत्री** | : | "राज्यातील सर्व क्षेत्रातील कामगारांना कामगार कायद्याच्या कक्षेत आणण्याबाबत" या विषयावरील श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, |

श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.रमेश शेंडगे, डॉ.दिपक सावंत, श्री.विनायक राऊत, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४२२७१ ला दिनांक १५ जुलै, २०१३ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : **(अ)** "महाराष्ट्र मोटार वाहन (दुसरी सुधारणा) नियम, २०१३ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एमव्हीआर.०११०/प्र.क्र.११४/ पु.बां.क्र. २९/परि-२, दिनांकित ९ मे, २०१३", सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** "महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा सदतीसावा वार्षिक अहवाल", सभागृहासमोर ठेवतील.

**(क)** "महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सन २००६-२००७, २००७-२००८ व २००८-२००९ या वर्षांचे वार्षिक अहवाल व सदर अहवालातील आयोगाचा सल्ला डावलल्याप्रकरणी संबंधित प्रशासकीय विभागांची आयोगाचा सल्ला न स्विकारण्याबाबतची कारणमिमांसा दर्शविणारी स्पष्टीकरणात्मक निवेदने", सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उद्योग मंत्री** **(अ)** "महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा एकतीसावा वार्षिक अहवाल", सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** "कोंकण विकास महामंडळ मर्यादितचा सन

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | २००५-२००६ या वर्षाचा पस्तीसावा वार्षिक अहवाल व लेखे", सभागृहासमोर ठेवतील. |
| **(३)** | **पर्यटन मंत्री** | : | | "महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २००६-२००७, २००७-२००८ व २००८-२००९ या वर्षांचा अनुक्रमे बत्तीसावा, तेहतीसावा व चौतीसावा वार्षिक अहवाल", सभागृहासमोर ठेवतील. |
| **(४)** | **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** | : | **(अ)** | "गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक अहवाल", सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | **(ब)** | "गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा अलग लेखा अहवाल", सभागृहासमोर ठेवतील. |
| | | : | **(क)** | "विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूरच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रण व महालेखापरिक्षक यांचा सन २००९-२०१० या वर्षाचा अलग लेखापरिक्षा अहवाल", सभागृहासमोर ठेवतील. |
| **(५)** | **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** | : | | "मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०१०-२०११ या वर्षाचे वार्षिक लेखे", सभागृहासमोर ठेवतील. |
| **(६)** | **महिला व बाल विकास मंत्री** | : | | "महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा वार्षिक अहवाल", सभागृहासमोर ठेवतील. |
| **(७)** | **पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री** | | | "महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादितचा सन २००३-२००४ २००४-२००५, २००५-२००६ व २००६-२००७ या वर्षांचा |

अनुक्रमे बत्तीसावा, तेहतीसावा, चौतिसावा व पस्तीसावा वार्षिक अहवाल", सभागृहासमोर ठेवतील.

(८) **पर्यावरण मंत्री** — "महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ याचा सन २०१०-२०११ या वर्षाचा वार्षिक अहवाल", सभागृहासमोर ठेवतील.

**तीन "लोकलेखा समितीचा तेरावा व चौदावा अहवाल सादर करणे."**

**चार : "अंदाज समितीचा एकतिसावा व बत्तिसावा अहवाल सादर करणे."**

**पाच : "अनुसूचित जमाती कल्याण समितीचा (सन २०१२-२०१३) सातवा अहवाल सादर करणे."**

**सहा : "रोजगार हमी योजना समितीचा सव्वीसावा अहवाल सादर करणे."**

**सात : "उपविधान समितीचा चौथा अहवाल सादर करणे."**

**आठ : "आश्वासन समितीचा एकशे अठ्ठयात्तरावा अहवाल सादर करणे."**

**नऊ : "अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे."**

**दहा म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - असल्यास.**

**अकरा : <u>मा.समिती प्रमुख, विधानपरिषद विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव -</u>**

"विधानपरिषद विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या, -

(१) श्री. पुरुषोत्तम खेडेकर लिखित "शिवरायांच्या बदनामीची केंद्रे" या पुस्तकातील मजकुरांवर आधारित "लोकप्रभा" अंकामधील प्रा.हरी नरके यांच्या "फॅसिस्ट शक्तींमुळे बहूजनांचे विभाजन" या लेखातील अवमानजनक लिखाणामुळे उद्‌भवलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

(२) सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री.भाई जगताप व इतर सन्माननीय सदस्यांनी श्री.निखिल वागळे, संपादक, आय.बी.एन. लोकमत व श्री.राजीव खांडेकर, संपादक, ए.बी.पी. माझा यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

या दोन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याकरिता म.वि.प. नियम १७८ (१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी."

**बारा : म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

**सर्वश्री विनोद तावडे,** पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम

गोऱ्हे, डॉ.रणजित पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, नागो गाणार, भगवान साळुंखे **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव - मंत्र्यांचे उत्तर -**

"कोरड्या दुष्काळामुळे गतवर्षी शेतकरी अडचणीत आला असताना यावर्षी अतिवृष्टीमुळे वर्धा, गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ व रत्नागिरी इत्यादी जिल्ह्यांसह बऱ्याचश्या जिल्ह्यातील नागरिकांच्या घराचे, शेतीचे व जनावरांचे अपरिमीत नुकसान होणे, एवढेच नव्हे तर बऱ्याच नागरीकांना या आपत्तीमध्ये जीव गमवावा लागणे, या जिल्ह्यांमधील लक्षावधी शेतकऱ्यांची शेती व या शेतीवरील नुकतेच पेरलेले पीक या अतिवृष्टीमुळे वाहून गेल्यामुळे कोट्यावधी रुपयांचे नुकसान होणे, शेतकऱ्यांचे न भरुन येणारे नुकसान झाल्यामुळे शासनाने ओला दुष्काळ जाहीर करण्याची आवश्यकता, परंतू शासनाकडून याबाबत अद्यापपर्यंत कोणतीही घोषणा न होणे, सलग दुसऱ्यावर्षीच्या गंभीर कोरड्या दुष्काळामुळे कोट्यावधी कोरडवाहू व बागायती शेतकऱ्यांचे अब्जावधी रुपयांचे नुकसान होणे, संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत न करता शासनामार्फत केवळ कंत्राटदारास लाभ होईल अशा चारा छावण्या व टँकरसाठी बहुतांश निधी खर्च करण्यात येणे, चारा छावण्या व चाराडेपोमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याची बाब सभागृहात मांडल्यानंतर या प्रकरणाची १५ दिवसात सीआयडी चौकशी करण्यात येईल असे आश्वासन सभागृहात देण्यात येणे, परंतू अद्यापपर्यंत या प्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात न येणे, दुष्काळ निवारणासाठी केलेल्या बहुतांश घोषणांची अंमलबजावणी न होणे, सद्यस्थितीत काही ठिकाणी चांगला पाऊस झाल्यामुळे काही नद्यांमध्ये बरेचसे पाणी आले असले तरी नद्यांमधील प्रदुषणाची पातळी वाढल्यामुळे कृत्रिम दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होणे, शासनाने हा दुष्काळ निवारणासाठी धोरणात्मक निर्णय न घेता तात्पुरती मलमपट्टी केल्याने परत राज्याला दुष्काळाला सामोरे जावे लागल्यास गंभीर संकट निर्माण होण्याची शक्यता असणे, पीककर्ज, बि-बियाणे, कोरडवाहू शेती अभियान इत्यादी योजनांमध्ये असलेल्या त्रुटींमुळे कोट्यावधी शेतकरी अडचणीत येणे, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना, विचारात घेण्यात यावी."

## - मध्यंतर -

**तेरा : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा -**

**सर्वश्री.विनोद तावडे,** पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम

गोऱ्हे, डॉ.रणजीत पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, नागो गाणार, भगवान साळुंखे **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा -**

"गत दीड वर्षापासून प्रत्येक अधिवेशनामध्ये सिंचनाची विविध प्रकरणे सभागृहात मांडण्यात येणे, तथापि त्यात झालेला गैरव्यवहार मान्य न करता इतर बाबीबाबतच श्वेतपत्रिका शासनाकडून काढण्यात येणे, श्वेतपत्रिका वस्तुस्थितीवर आधारित नसल्याने, हिवाळी अधिवेशन, २०१२ मध्ये विरोधी पक्षाने सभागृहात घेतलेली आक्रमक भूमिका, त्यानुसार, या संपूर्ण गैरव्यवहाराची एस.आय.टी. मार्फत चौकशी करण्याचे मान्य करण्यात येणे, तथापि एस.आय.टी. कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट अंतर्गत स्थापना करण्याची व तिची कार्यकक्षा तातडीने वाढविण्याची आवश्यकता, शासनाच्या संदिग्ध भूमिकेबाबत जनतेमध्ये निर्माण झालेला संभ्रम, सिंचन गैरव्यवहाराचा योग्यरितीने तपास होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना."

**चौदा : शासकीय विधेयके -**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे -**

**(१)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २३ - मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) विधेयक, २०१३

**क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रामदास कदम वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २३ - मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २३ - मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही

सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २३ - मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विनायक राऊत, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २३ - मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३

**पंधरा : म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव -**

**सर्वश्री विनोद तावडे,** रामदास कदम, पांडुरंग फुंडकर, जयंत पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजित पाटील, श्री रामनाथ मोते, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, नागो गाणार, भगवान साळुंखे **वि.प.स. याचा म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव -**

"एमएमआरडीए क्षेत्रातील मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, भिवंडी, वसई-विरार, मिरा-भाईंदर इत्यादी महानगरपालिकांमध्ये निधी अभावी रस्ते विकास, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व दळणवळणाच्या समस्या निर्माण होणे, या क्षेत्रात पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी नेमलेल्या मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने मेट्रो रेल्वे

प्रकल्प, मोनो रेल्वे प्रकल्प, कांदळवन उद्यान इत्यादी प्रकल्पांची घोषणा करणे, परंतु सर्व प्रकल्पांचे काम रखडलेले असणे, सर्व प्रकल्पाचे काम रखडल्यामुळे मुंबईत दळणवळणाच्या समस्या निर्माण होणे, ही कामे वेळेत पूर्ण न झाल्यामुळे कंत्राटदारावर कारवाई करण्याची आवश्यकता असताना एमएमआरडीए च्या अधिकाऱ्यांकडून संबंधित कंत्राटदारावर कोणतीही कारवाई करण्यात न येणे, घनकचरा व्यवस्थापनाचे काम एमएमआरडीए मार्फत रामकी या काळ्या यादीत असलेल्या भ्रष्ट कंपनीस देण्याचा घाट शासनामार्फत घालण्यात येणे, एमएमआरडीए मध्ये भ्रष्टाचार होत असताना म्हाडा व सिडकोमध्ये भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस येऊनही त्यांच्यावर कारवाई न होणे, धोकादायक इमारतीचा प्रश्न ऐरणीवर आलेला असताना व या वर्षी होणाऱ्या अतिवृष्टीमुळे या प्रश्नाने गंभीर स्वरुप धारण केलेले असताना शासनाकडून नागरिकांच्या सुरक्षितेबाबत कोणताही धोरणात्मक निर्णय घेण्यात न घेणे, डिम कन्व्हेनिअन्सबाबत मा.मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक घोषणा केलेली असताना घोषणेची अमलबजावणी मात्र करण्यात न येणे, मुंबई विमानतळामुळे विस्थापित झालेल्या लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी नेमलेल्या एमआयएएल कंपनीने हजारो प्रकल्पग्रस्तांचे अद्यापपर्यंत पुनर्वसन न करणे, त्याचवेळेस नवी मुंबई विमानतळाची घोषणा सन २००५ पासून करुनही अद्यापपर्यंत विमानतळासाठी आवश्यक असणारी जमिन देखील संपादित करण्यास शासनास अपयश येणे, एमएमआरडीए क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी महानगरपालिका व शासनाच्या विविध यंत्रणा यांचा समन्वय घडवून केंद्र शासनाकडून जास्तीतजास्त निधी उपलब्ध होईल याकरिता एक समन्वय समिती असण्याची आवश्यकता परंतु या सर्व समस्यांबाबत शासनाचे झालेले दुर्लक्ष त्यामुळे जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची कारवाई व याबाबतची शासनाची भूमिका विचारात घेण्यात यावी.

**सोळा : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये- (बैठकीच्या शेवटी) -**

**मंगळवार, दिनांक २३ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमांत दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धातास चर्चेच्या सूचना - (क्रमांक १ व २) -**

**(१) डॉ.निलम गोऱ्हे, वि.प.स.**

"महिलांवरील अत्याचारांचे वेगवेगळ्या न्यायालयात प्रलंबित असलेले खटले लवकरात लवकर निकाली काढण्याबाबत" या विषयावरील श्री.संजय दत्त व इतर वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ३७४५७ ला दिनांक १३ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(२) **डॉ.निलम गो-हे, वि.प.स.**

"पुणे जिल्ह्यातील झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्यासाठी राबविण्यात येणा-या योजनेबाबत" या विषयावरील ॲड.जयदेव गायकवाड व इतर, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ३७२७६ ला दिनांक १३ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**बुधवार, दिनांक २४ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमांत दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धातास चर्चेच्या सूचना - (क्रमांक ३ व ४) -**

(३) **श्री. रामनाथ मोते, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"माध्यमिक शाळेस जोडलेल्या उच्च माध्यमिक शाळेत विषयाच्या आवश्यकतेनुसार पात्र शिक्षक उपलब्ध असल्यास त्या शिक्षकास उच्च माध्यमिक विभागात सेवाज्येष्ठतेनुसार २८/०४/१९८० च्या आदेशानुसार नेमणूकीची तरतूद असणे, माध्यमिक शिक्षकास उच्च माध्यमिक विभागाकडे नियुक्ती देण्यात येऊ नये असे आदेश शासनाने १९/०७/१९९९ रोजी काढणे, काही शाळांमध्ये माध्यमिक शिक्षकास उच्च माध्यमिकचा कार्यभार देऊन विशेष वेतनासह उच्च माध्यमिकची मान्यता असणे, उच्च माध्यमिक विभागात पूर्णवेळचे पद निर्माण झाल्यास या शिक्षकांना डावलून नवीन शिक्षकांची नियुक्ती करणे, वर्षानुवर्षे मान्यता असलेल्या व उच्च माध्यमिकचा कार्यभार सांभाळणाऱ्या अनुभवी शिक्षकांना डावलण्यात येणे, या शिक्षकांना प्राधान्य देण्याबाबत संचालकांनी शिफारस करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही."

(४) **श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील झाडीपट्टीतील माजी मालगुजारी तलावांच्या संवर्धनासाठी विशेष योजना तयार करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री यांनी जलसंवर्धन मंत्री यांना माहे मार्च, २०१३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात देण्यात येऊनही या निर्देशाप्रमाणे अद्यापही विशेष योजना तयार करण्यात न येणे, चंद्रपूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेतंर्गत असलेले ५२२ माजी मालगुजारी तलाव प्रदूषण व अतिक्रमणाच्या विळख्यात सापडणे, दुष्काळाच्या स्थितीत या तलावांचे खोलीकरण व स्वच्छता केल्यास तेथील नागरिकांना पाण्याची व्यवस्था होण्याची शक्यता असल्याने या मालगुजारी तलावांचे खोलीकरण व स्वच्छता करण्याकरिता शासनाने विशेष मोहिम हाती घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व

करावयाची कार्यवाही.

**गुरुवार, दिनांक २५ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमांत दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धातास चर्चेच्या सूचना - (क्रमांक ५ व ६) -**

(५) **श्री.रामनाथ मोते, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"इंग्रजी माध्यम वगळता अन्य माध्यमातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी संख्या दिवसेंदिवस कमी होणे, माध्यमिक शाळांसाठी तुकड्या टिकवण्यासाठी विद्यार्थी संख्येचे निकष शिथिल करण्याचा धारेणात्मक निर्णय घेणे, या निर्णयातून प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळा वगळणे, शिक्षण हक्क विधेयकाच्या अनुषंगाने तुकड्यांची संकल्पना रद्द होणे, पटावरील विद्यार्थी संख्येच्या आधारे संच मान्यता न होणे, शिक्षण हक्क विधेयकाची अंमलबजावणी न होणे, प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील तुकड्या टिकविण्याचे निकष शिथील करण्याबाबत वारंवार विनंती करुनही शासनाने दखल न घेणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री.जयंत पाटील, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील विजेची मागणी व पुरवठा यामध्ये तफावत पाहता अपारंपारिक ऊर्जेचाही वापर करणे आवश्यक असणे, राज्यातील ग्रामीण भागाला पर्यावरण संतुलन प्रणित मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने आणि भारनियमन टाळून विनाव्यत्यय अपारंपारिक स्त्रोतातून निर्मित वीजेचा पुरवठा होण्यासाठी ग्रामीण भागातील रस्त्यांवर सौर पथ दिव्यांचे खांब बसविण्याच्या प्रस्तावास शासनाने मान्यता देणे, या योजनेसाठी सन २०१०-११ या आर्थिक वर्षासाठी राज्य निधीतून रुपये ९.०० कोटीचा निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांचे अधिनस्त ठेवण्यात आलेला असणे, तसेच दि.३१-३-२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट ॲथॉरिटीच्या दरकरार सूचितील पर्ल एन्टरप्रायझेस, पुणे व कृषी सोलर, पुणे या दोन एजन्सी पात्र ग्रामपंचायतीमध्ये सौर पथ दिवे स्थापित करण्यासाठी नेमण्यात येणे, राज्यामध्ये सुमारे ७०० कंपन्यांपैकी ७० कंपन्यांनी रुपये १० लाख भरुन रेट कॉन्ट्रक्टमध्ये नोंदणी केली असता राज्यातील फक्त पर्ल एन्टरप्राईझेस, पुणे व कृषी सोलर, पुणे याच दोन कंपन्यांचा विचार करण्यात येणे, तथापि अन्य कंपन्यांचा विचार करण्यात न येणे, सन २०१०-११ या आर्थिक वर्षासाठी राज्य निधीतून उपलब्ध झालेल्या रुपये ९.०० कोटी निधीमधून आतापर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली व किती

ठिकाणी सोलर लाईट पुरविण्यात आलेले असणे."

**सोमवार, दिनांक २९ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमांत दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धातास चर्चेच्या सूचना - (क्रमांक ७ व ८) -**

**(७) श्री.जयंत पाटील, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील नारंगीचा टेप येथील श्री.किर्तीकुमार गणपत पाटील यांचे विरुध्द क्र. ३५/२००९ अन्वये हद्दपार प्रस्ताव दाखल होऊनही त्यांचे विरुध्द उप विभागीय अधिकारी, अलिबाग यांचेकडून कारवाई न होणे, श्री.किर्तीकुमार पाटील यांनी उप विभागीय अधिकारी, अलिबाग यांच्याकडे सक्षम पुरावा दाखल करते वेळी खोटे साक्षीदार उभे करुन शासनाची फसवणूक केल्याबाबत मंडळ अधिकारी, सारळ (ता.अलिबाग, जि.रायगड) यांनी दिनांक २९/११/२०१० रोजी उप विभागीय अधिकारी, अलिबाग यांचेकडे अहवाल सादर करणे, सबब उप विभागीय अधिकारी, अलिबाग व खोटे साक्षीदार यांच्या विरुध्द शासनाने कारवाई करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान यासारखी महत्त्वाकांक्षी योजना राज्यात कार्यरत असूनही राज्यातील आरोग्य यंत्रणेच्या निष्काळजीपणामुळे राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या उद्दीष्टपूर्तीमध्ये राज्याची पिछेहाट होत असणे, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाद्वारे राज्यातील आरोग्य संस्थांना वितरीत होणाऱ्या निधीचे सुयोग्य नियोजन व संनियंत्रण करणे आवश्यक असणे, एन.आर.एच.एम.च्या मदतीने दर्जेदार व खाजगी रुग्णालयाशी स्पर्धा करणाऱ्या सरकारी आरोग्य संस्था निर्माण करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**मंगळवार, दिनांक ३० जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमांत दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धातास चर्चेच्या सूचना - (क्रमांक ९ व १०) -**

**(९) श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स.**

"राज्यातील बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे ११०० कोटी रुपयांचा निधी नियोजनाच्या अभावामुळे पडून असल्याबाबत" या विषयावरील श्री.जयवंतराव जाधव व इतर वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ३७३७२ ला दिनांक ५ एप्रिल, २०१३ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(१०) **श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.**

"राज्यात शासकीय आश्रम शाळांमधील अधिक्षकांची सुमारे २४७ पदे रिक्त असल्याबाबत" या विषयावरील श्री.मनिष जैन, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ३८०८७ ला दिनांक २५ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणा-या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(११) **श्री.चंद्रकांत पाटील, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात सन २००७ ते २०१२ या कालावधीत बालगुन्हेगारांची संख्या वाढली असल्याचे गुन्हे अन्वेषण शाखेअंतर्गत शासनाच्या निदर्शनास येणे, ६ ते १८ वयोगटातील मुलांचा दरोडा, चोरी, घरफोडी, खून, बलात्कार इत्यादी घटनांमध्ये समावेश असणे, अनाथ मुलांबरोबर ज्या मुलांची आर्थिक स्थिती चांगली आहे अशा मुलांचाही त्यात समावेश असल्याचे निदर्शनास येणे, बालगुन्हेगारी रोखण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१२) **श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील आधीच अवसायनात आणि कर्जबाजारी असलेल्या साखर कारखान्यांनी ऊस उत्पादकांना कर्ज वाटप केल्याचे दाखवून या कर्जाच्या सुमारे दोन कोटी रुपयांच्या माफीचा प्रस्ताव शासनास माहे एप्रिल, २०१३ च्या सुमारास सादर करण्यात येणे, तसेच कारखान्यांशी संगनमत करुन टक्केवारीसाठी तत्कालिन निलंबित विशेष लेखा परिक्षकाने सदरचे प्रस्ताव सादर करण्यास केलेली मदत, सदरच्या प्रस्तावांना मंजूरी मिळाल्यास शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होण्याची शक्यता, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन संबंधित निलंबित लेखा परिक्षक व संबंधित कारखान्यांच्या संचालकांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ३१ जुलै, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.